**पत्र**

जा.क्र.कृ.आ./पीपीपी/द्राक्ष/मा.सु.-१४-१५/**१९४०**/२०१५.
कृषि आयुक्तालय, (फलोत्पादन विभाग) महाराष्ट्र राज्य,
पुणे :- ४११ ००५. दिनांक : **२९/०६/२०१५.**

**प्रति,**

१) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
नाशिक, सांगली, सोलापूर, पुणे.

२) महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ,
द्राक्ष भवन मार्केट यार्ड, पुणे -३७.

**विषय : राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत सन २०१५-१६ मध्ये शासकीय आणि खाजगी क्षेत्राच्या सहभागातून द्राक्ष पिकांसाठी भाडेतत्त्वावर यंत्र सामुग्रीच्या वापराचा प्रकल्प...**

**संदर्भ : १) शासन निर्णय क्र. राकृवियो २०१३/प्र.क्र. २५/ राकृवियो कक्ष दि. २१ फेब्रुवारी २०१३.**
**२. शासन निर्णय क्र. राकृवियो २०१३/प्र.क्र. २५/ राकृवियो कक्ष दि. २६ फेब्रुवारी २०१३.**
**३. शासन निर्णय क्र.राकृवियो२०१४/प्र.क्र.१५/राकृवियो कक्ष दि. २८ एप्रिल २०१४**
**४. शासन निर्णय क्र.बैठक-०४१५/प्र.क्र३७/राकृवियो कक्ष दि. १५ मे २०१५.**

उपरोक्त विषयांस अनुसरून कळविण्यात येते की, सन २०१५-२०१६ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजनेतंर्गत द्राक्ष पिकांसाठी शासकीय आणि खाजगी क्षेत्राच्या सहभागातून महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघामार्फत भाडे तत्वावर सुधारीत यंत्र सामुग्रीचा वापरावयाचा प्रकल्प (Public Private Partership hiring of Machineries for viticulture Mangement order RKVY) वरील संदर्भीय अनु.क्र. ४ अन्वये शासनाने दिनांक १५ मे २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे.

या प्रकल्पासाठी सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना तयार केल्या असून सोबत जोडले आहे.तसेच याबाबतचा शासन निर्णय निर्गमित झाला असून प्रत सहपत्रित करण्यात येत आहे. या मार्गदर्शक सुचनाच्या आधारे वरील प्रकल्प प्रभावीपणे राबविण्यात यावा.

**सोबत :- १) मार्गदर्शक सूचना**
**२)शासन निर्णयाची प्रत**

**स्वाक्षरीत/-**
**संचालक (फलोत्पादन)**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११००५**

**प्रत :- मा. अपर मुख्य सचिव,(कृषि व पणन),कृषि व पदुम विभाग मुंबई-३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.**

२ मा. आयुक्त कृषि यांचे कृषि उप संचालक, आयुक्त कक्ष कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना माहितीस्तव सविनय सादर.

३)संचालक राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र मांजरी पुणे यांना माहितीस्वत

४) मुख समन्वयक तथा कृषि सह संचालक विस्तार व प्रशिक्षण साखर संकूल पुणे -५ यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

५) कृषि सह संचालक नियोजन व अंदाजपत्रक कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे-५ यांाना माहितीस्तव.

६) विभागीय कृषि सह संचालक पुणे, नाशिक, सोलापूर, यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

## मार्गदर्शक सूचना सन २०१५-२०१६

शासकीय आणि खाजगी क्षेत्राच्या सहभागातून द्राक्ष पिकांसाठी उत्पादन ते विक्री व्यवस्थेकरीता भाडे तत्वावर आधुनिक यंत्र सामुग्री वापरा बाबतचा प्रकल्प (महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ पुणे)

**Public Private Partnership Project for hiring of Machineries for Viticulture Management under RKVY**

**संदर्भ : १) शासन निर्णय क्र. राकृवियो २०१३/प्र.क्र. २५/ राकृवियो कक्ष दि. २१ फेब्रुवारी २०१३.**
**२) शासन निर्णय क्र. राकृवियो २०१३/प्र.क्र. २५/ राकृवियो कक्ष दि. २६ फेब्रुवारी २०१३.**
**३) शासन निर्णय क्र.राकृवियो२०१४/प्र.क्र.१५/राकृवियो कक्ष दि. २८ एप्रिल २०१४**
**४) शासन निर्णय क्र.बैठक-०४१५/प्र.क्र३७/राकृवियो कक्ष दि. १५ मे २०१५.**

### ➢ प्रस्तावना :-

उत्पादकता वाढीसाठी शासनाच्या कृषि विभागामार्फत विस्ताराचे अनेक कार्यक्रम राबविले जातात. या विस्तार कार्यक्रमामध्ये मुख्यतः सार्वजनिक क्षेत्रात विकसीत म्हणजेच कृषि विद्यापिठामार्फत विकसीत तंत्रज्ञानाच्या प्रस्तावावर भर दिला जातो. उत्पादकता वाढीसाठी खाजगी क्षेत्रात सुध्दा तंत्रज्ञान विकसित केले जाते. उदा. खाजगी कंपन्यामार्फत विकसीत पिकांचे विविध वाण, खते, औषधे इ. तसेच शेतक-यांसाठी खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रामार्फत विस्तार सेवा सुध्दा दिल्या जातात. परंतू उत्पादन वाढीकरीता सुधारीत यंत्र सामुग्रीचा वापर फार कमी प्रमाणात होतो.तसेच द्राक्ष शेतीमध्ये द्राक्षाची गुणवत्ता व उत्पादन वाढीकरीता यांत्रिकीकरणाला विशेष महत्व प्राप्त झालेले आहे. द्राक्ष उत्पादकाचा समुह स्थापन करून सदर समुहातील शेतक-यांना सुधारीत यंत्र सामुग्रीचा वापर भाडेतत्वावर उपलब्ध करून देणे बाबत महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघानी पुढाकार घेतलेला आहे.सन २०१५-१६ मध्ये हा प्रकल्प राबविण्याचा शासन निर्णय क्र. बैठक ०४१५ प्र.क्र.३७/राकृवियो कक्ष दिनांक १५ मे २०१५ अन्वये शासन निर्णय निर्गमित झालेला आहे.(सुलभ संदर्भासाठी प्रत जोडली आहे.)

शेतक-यासाठी काम करणा-या विविध यंत्रणा/ कंपन्यांमार्फत द्राक्ष पिकामध्ये उत्पादन ते विक्री व्यवस्था विकासासाठी भाडे तत्वावर सुधारीत यंत्र सामुग्रीचा वापर करीता हा प्रकलप राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

खाजगी कंपन्यामार्फत पिकावरील किडी व रोगांचे प्रभावीपणे नियंत्रण करण्यासाठी नविन तंत्रज्ञानाचा अवलंब केला जातो. तसेच बदलत्या वातावरणामुळे द्राक्ष पिकावरील किडी व रोगांचे

प्राथमिक अवस्थेत नियंत्रण करण्याकरीता रोग अनुमान केंद्राचा वापर करून निर्यातक्षम व उर्वरीत अंशमुक्त उत्पादन करणेकरीता शेतकरी आणि निर्यातदार यांना एकत्र आणून गटशेतीद्वारे शेतक-यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यास या प्रकल्पाची मदत होवू शकते. उपरोक्त तत्वावर कार्यान्वित योजना राष्ट्रीय कृषि विकास योजना तसेच खाजगी संयुक्त सहभागाने राज्यात प्रकल्प राबविण्याचे निश्चित केले आहे. या प्रकल्पांना खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्राच्या सहभागाद्वारे एकात्मिक कृषि विकासाठी प्रकल्प Public Private Partnership For Integrated Agriculture Development in (PPPIAD) असे संबोधझ्यात येईल. शेतक-यांसाठी काम करणा-या विविध यंत्रणेमध्ये समन्वय साधून उत्पादन ते विक्री/ निर्यात व्यवस्था मुल्य साखळी विकासासाठी द्राक्ष पिकासाठी विस्तार प्रकल्प राबवावयाचा आहे.

- **प्रकल्पाचा उददेश :-** जागतिक बाजार पेठे बरोबरच स्थानिक बाजार पेठेतील ग्राहकांना निर्यातक्षम दर्जाची व गुणवत्तेची तसेच उर्वरीत अंश मुक्त द्राक्ष पुरवठा करण्याच्या दृष्टी कोनातून आधुनिक यंत्र सामुग्रीचा भाडे तत्वावर समुहामार्फत वापर करण्यासाठी उदिदष्ठे निश्चित केलेली आहेत. ती पुढिलप्रमाणे.

१ आदर्श व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करणे.

२ नविन यंत्रसामुग्रीचा वापर करून द्राक्ष पिकाचे उत्पादन व उत्पादकता वाढविणे.

३ उर्वरीत अंश मुक्त मालाचे उत्पादन करून ग्राहकास तशी हमी देणे.

४ काढणी पश्चात तंत्रज्ञानाचा वापर करून मुल्यवृध्दी करणे.

- **प्रकल्पाचा गोषवारा**

**कार्यक्षेत्र**

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **समुहाची संख्या** |
|---|---|---|
| १ | नाशिक | १८ |
| २ | सांगली | ०५ |
| ३ | सोलापूर | ०३ |
| ४ | पुणे | ०१ |
| | **एकुण** | **२७** |

# जिल्हानिहाय समुहाचा तपशील

| Sr.No | Name of the clusters | Name & Address of the Leaders | No. of Member | Area covered underd cluster |
|---|---|---|---|---|
| A) | **NASHIK DISTRICT** | | | |
| 1. | Gangasagar Shetkari Swayam Sahyata Gat | Namdev Shivaji Baste, A/P, Talegaon Vani, Tal. Dindori , Dist. Nashik | 39 | 113 Acre |
| 2. | Banganga Shetkari Group | Sanket Rajiv Gaikwad , A/P Ozar ( Mig), Tal. Niphad, Dist. Nashik | 30 | 106.75 Acre |
| 3. | Shri. Krishna Shetkari Group | Suresh Eknath kalamkar , A/P Ozar ( Mig), Tal. Niphad, Dist. Nashik | 24 | 128.93 Acre |
| 4. | Green Gold Farmers Self Helpn Group | Rahul Ramesh Bhalerao, A/P. Tisgaon , Tal. Dindori, Dist.Nashik-422205 | 30 | 191.12 Acre |
| 5. | Krushiratna Shetkari Mandal | Ananda Narhari Borgude, A/P, Rampur, Post Naitale, Tal. Niphad, Dist. Nashik | 44 | 225.025 Acre |
| 6. | Tulja Bhavani Bachat Gat | Sandeep Jagannath Ugale, A/P. Lokhandiwadi, Tal. Dindori, Dist. Nashik | 26 | 135.27 Acre |
| 7. | Bhumi Shetkari Gat | Subhash Vishnupant Gaikwad, A/P. Lokhandiwadi, Tal. Dindori, Dist. | 16 | 131 Acre |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Nashik | | |
| 8. | Krushidhan Draksha Utpadak Shetkari Gat | Bhaskar Ganpat Nigal, A/p. Palkhed (B), Tal Dindori, Dist. Nashik | 19 | 159 Acre |
| 9. | Saptashrungi Shetkari Swayam Sahayata Gat | Banban Sonuji Purkar, A/p.Dhondgavan, Tal. Chandvad, Dist. Nashik | 23 | 109.8 Acre |
| 10 | P.P.F. Krushi Vikas Shetkari Mandal | Ramhari Suresh Padol, A/p. Sonewadi BK, Tal. Niphad, Dist. Nashik | 21 | 138.7 Acre |
| 11. | Abhinav Shetkari Swayam Sahayata Gat | Madanrao Shankarrao Pingale, A/p. Matori, Tal & Dist. Nashik 422003 | 31 | 151.87 Acre |
| 12. | Pandurang Draksha Utpadak Swayam Sahayata Gat | Valu Gopal kasabe, A/p. Vadgaon, Tal & Dist. Nashik | 32 | 192 Acre |
| 13 | Shri. Govind Shetkari Bachat Gat | Nivruti Ashok Shinde, A/p. Vadner Bhairav, Tal. Chandwad , Dist. Nashik | 15 | 143.97 Acre |
| 14. | Shayadri Draksha Utpadak Gat | Kantilal Madhukar Bhadange, A/p Pimpalgaon (B), Tal. Niphad, Dist . Nashik | 23 | 142.84 Acre |
| 15. | Shri. Sant Janardan Shetkari Gat | Arun Maruti Kushare, A/p. Sawargaon, Tal. Niphad, Dist. . Nashik | 41 | 146.15 Acre |
| 16 | BOB Adarsha Shetkari Mandal | Sanjay Balkrushana Sathe , A/p Naitale, Tal. | 19 | 102.65 Acre |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | Niphad, Dist. . Nashik | | |
| 17 | Pragati Krushi Mandal | Vaibhav Somnath Taskar, A/p, Rui, Tal. Niphad, Dist. . Nashik | 24 | 130.17 Acre |
| 18 | Sahayadri Krushi Shetkari Gat | Khanderao Doulat Shewale. At ï Bhuyane, Post ï karanjad, Tal. Satana, Dist. Nashik | 31 | 115 Acre |
| | | **Total** | **488** | **2345** |
| **B)** | **SANGLI DISTRICT** | | | |
| 1. | Shri.Shidheswar Draksha Bagaitdar Shetkari Gat | Malhari Mahadev Mali, A/p, Savlaj, Tal. Tasgaon, Dist. Sangli | 45 | 167.5 Acre |
| 2 | Shri. Swami Samarth Draksha Uttpadak Mandal | Nitin Vassantrao Deval A/p. viyannager, Maisal , Dist. Sangli | 24 | 166.55Acre |
| 3. | The Golden Grape Harvest | Sanjay Bhimrao Bargle, A/p Malagaon, Dist. Sangli | 24 | 138 Acre |
| 4. | Gurudatta Mauli Draksha Bedana Utpadak Gat | Jalindar Jagannath Maske, A/p Nimani, Dist. Sangli | 31 | 137.3 Acre |
| 5. | Shri. Ganesh Draksha Bedana Utpadak Gat | Suresh Ganpati Ekunde, A/p. Manerajuri, Dist. Sangli | 34 | 135.39 Acre |
| | | **Total** | **158** | **745.74** |
| **C)** | **PUNE DISTRICT** | | | |
| 1. | Junnar Taluka Draksha Uttpadak Sangh | Jetendra Chandrakant Bidwai., A/p. Jannar. Dist. Pune | 19 | 107 Acre |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | **Total** | **19** | **107** |
| **D)** | **SOLAPUR DISTRICT** | | | |
| 1 | Shri. Bhagwant Shetkari Gat | Lalasheb Raosaheb Gavhane, At ï Hingani, Post ï Malegaon , Tal. Barshi, Dist-Solapur | 13 | 102 Acre |
| 2 | Bhairvanath Shetkari Gat | Tanaji Babu pawar, A/p. Honsal, Tal. N. Solapur , Dist. Solapur | 13 | 105 Acre |
| 3 | Swami Samarth Shetkari Gat | Dattakumar Swamirao Sakhare, 1148, Subhash Gallli, Akkalkot, Dist. Solapur | 8 | 108 Acres |
| | | **Total** | **34** | **315** |
| | | **एकूण एकंदर** | 699 | 3512 |

➢ **प्रकल्पाचा कालावधी :- १ वर्ष (२०१५-२०१६)**

सदर प्रकल्पाअंतर्गत प्रत्येक समुहाकरीता भाडेतत्वावर वापराकरिता खरेदी करावयाच्या मशनरीची यादी पुढील प्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मशनरीचे नांव** | **एका समुहाकरीता मशनरीची संख्या** | **२७ समुहाकरीता मशनरीची संख्या** |
|---|---|---|---|
| 1 | Electrostatic Spraying System **or** Electrostatic Spraying System ( American) | 2 | 54 |
| 2 | Air Blast sprayer **or** Low Volume Sprayer | 4 | 108 |
| 3 | Shredder ï Tractor operated **or** Mulcher | 1 | 27 |
| 4 | Battery operated tying tool | 10 | 270 |
| 5 | Manure spreader ï Tractor operated | 1 | 27 |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | Soil working implements offset tractor operated | 1 | 27 |
| 7 | Duster Tractor operated | 2 | 54 |
| 8 | NPK level indicator<br>A. Manual operated<br>B. Tractor mounted | <br>1<br>1 | <br>27<br>27 |
| 9 | Tractor operated weedicial spraying automatic sensor<br>A. Manual operated | 1<br><br>2 | 27<br><br>54 |
| | TOTAL | 27 | 702 |

➢ **समुहाची निवड :-** महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघ यांनी सदर योजने अंतर्गत २७ समुहाची व समुहातील ६९९ शेतक-यांची निवड केली आहे. त्याचा जिल्हानिहाय तपशील खालील प्रमाणे

| **अ.क्र.** | **जिल्हा** | **समुहाची संख्या** | **सदस्याची संख्या** | **समुहातील क्षेत्र** |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | १८ | ४८८ | २३४५ |
| २ | सांगली | ०५ | १५८ | ७४५ |
| ३ | सोलापूर | ०३ | ३४ | ३१५ |
| ४ | पुणे | ०१ | १९ | १०७ |
| | **एकुण** | **२७** | **६९९** | **३५१२** |

समुहातील शेतक-यांची निवड करण्याची कार्यपध्दती - महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायदार संघ पुणे यांनी कृषि विभागाच्या संबंधित कृषि तालुका अधिका-याच्या सहाय्याने प्रकल्प अंमलबजावणीसाठी खालील कार्यपध्दतीचा अवलंब करावा.

१ निवड झालेल्या समुहातील द्राक्ष बागायतदाराची यादी निश्चित करावी.

२ सदर समुहात निवड करण्यात आलेल्या द्राक्ष बागायतदाराची ग्रेपनेट ऑनलाईन प्रणाली अंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक राहिल.

३ नोंदणी करण्याकरीता सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये माहिती भरून संबंधित तालुका कृषि अधिकारी यांचेकडे त्वरीत सादर करावी. अर्जासोबत शेतीचा ७/१२ व नकाशा जोडणे आवश्यक आहे.

४ समुहाअंतर्गत निवड केलेले शेतकरी व संबंधित शेतकरी यांचेमध्ये भाडे तत्वावर सुधारीत मशनरीच्या वापराबाबत करार करण्यात यावा व कराराची प्रत संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावी.

➢ **समुहाच्या जबाबदा-या व कर्तव्य :-**

१ सदर योजनेअंतर्गत निवड केलेल्या समुहाने संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी याच्या कार्यालयाकडे नोंद करणे आवश्यक आहे.

२ समुहाच्या वतीने एका प्रतिनिधीची निवड करणे आवश्यक आहे व त्यांनी समुहाच्या वतीने अदयावत रेकॉर्ड ठेवायचे आहे.

३ समुहाच्या वतीने खरेदी करण्यात आलेल्या मशनरीचा वापर भाडे तत्वावर करण्याकरीता प्रत्येक मशीन निहाय आकारण्यात येणारे भाडे निर्धारित करून तसे संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कळवावे.

➢ **प्रकल्प, नियोजन कार्यान्वये व सहनियंत्रण**

१ शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. राकृवियो/४१५/प्रकरण क्र.३७/राकृवियो कक्ष दिनांक १५ मे २०१५ अन्वये मंजूर प्रकल्प राबविण्याकरीता.मा. आयुक्त कृषि यांच्या अध्यक्षतेखाली राज्य प्रकल्प समन्वय समिती स्थापन करण्यात आलेली आहे. द्राक्ष पिकांचा मंजूर प्रकल्प राबविण्याकरीता शासन निर्णयातील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय समन्वय समिती स्थापन करण्यात येत आहे.

➢ **राज्यस्तरीय समन्वय समिती**

| | |
|---|---|
| संचालक फलोत्पादन | अध्यक्ष |
| संचालक, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र मांजरी | सदस्य |
| अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायदार संघ पुणे | सदस्य |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे, नाशिक, सांगली, सोलापूर | सदस्य |
| कृषि उपसंचालक (फलोत्पादन) | सदस्य |
| समन्वयक तथा तंत्र अधिकारी, फलोत्पादन | सदस्य, सचिव |

➢ **जिल्हास्तरीय समन्वय समिती-राज्यस्तरावर राज्य प्रकल्प समन्वय समिती मार्फत समन्वय व संनियंत्रण केले जाईल.**

| | |
|---|---|
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | अध्यक्ष |
| शास्त्रज्ञ, राष्ट्रीय द्राक्ष संशोधन केंद्र मांजरी पुणे | सदस्य |
| महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायदार संघाचे प्रतिनिधी | सदस्य |
| संबंधित तालुका कृषि अधिकारी | सदस्य |
| जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयातील कृषि उप संचालक | सदस्य, सचिव |

➢ **प्रकल्प समन्वय कार्यपध्दती-**

राज्यस्तरावर राज्य प्रकल्प समन्वय समितीमार्फत समन्वय व सनियंत्रण केले जाईल. फळे पिका करीता **श्री गोविंद हांडे, तंत्र अधिकारी,** फलोत्पादन संचालक यांची ÎÎसमन्वय अधिकारीÓ म्हणून नेमणूक केली आहे. email phytocell@gmail.com mobile no. 9423575956

➢ **राज्यपातळीवर प्रकल्पाचे महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचे व समुहाचे समन्वयक खालील प्रमाणे राहतील**

| Sr. No | Name of Co-ordinator | Designation | E-Mail | Contact No. |
|---|---|---|---|---|
| १. | अशोक गायकवाड | अध्यक्ष, राष्ट्रीय द्राक्ष बागायतदार संघ, पुणे. | mrdbs@gmail.com | ९८९००३३००१ |
| २. | महिंद्र शाहिर | सचिव, राष्ट्रीय द्राक्ष बागायतदार संघ, पुणे. | mrdbs@gmail.com | ९९६०२८५६२१ |

➢ **जिल्हास्तर :-**

जिल्हा समन्वय समितीमार्फत प्रकल्पाचे नियोजन अंमलबजावणीचे समन्वय केले जाईल. जि.अ.कृ.अ कार्यालयातील कृषि उपसंचालक हे या प्रकल्पाचे नोडल ऑफिसर असतील व दर आठवडयात क्षेत्रीय पातळीवरील कंपनी प्रतिनिधीकडील प्रकल्पाचे भौतिक, आर्थिक लक्षांक, त्यांचप्रमाणे साध्य, कंपनीचा सहभाग त्यानुसार व योजनानिहाय भौतिक / आर्थिक साध्य, शेतक-यांचा सहभाग भौतिक /आर्थिक साध्य व शासनाचा सहभाग त्यानुसार व योजनानिहाय भौतिक /आर्थिक साध्य, अनुदान उपलब्धता करुन अनुदान प्रत्यक्ष वितरण करणे, अनुदानाची मागणी व नियोजन, झालेल्या खर्चाची माहिती अद्यावत करणे इ.

बाबीची संपुर्ण माहिती संकलन करण्याची जबाबदारी जि.अ.कृ.अ व संबंधित नोडल ऑफिसर यांची राहिल.

| अ.क्र. | नोडल ऑफिसरचे नाव | भ्रमणध्वनी क्र | ई- मेल | समाविष्ट समुह |
|---|---|---|---|---|
| १ | श्री टी एन जगताप, जिअकृअ, नाशिक | ९४२३५८२६५४ | dsaonsk@gmail.com | २७ |
| २ | श्री शिरीष जमदाडे, जिअकृअ, सांगली | ९४२२४६३२०६ | dsaosangli@gmail.com | ०९ |
| ३ | रफिक नाईकवडी, जिअकृअ, सोलापूर | ९५२७१०७८१८ | dsaosolapur@gmail.com | ०३ |
| ४ | श्री सुभाष काटकर, जिअकृअ, पुणे | ९८५०५५५७७७ | dsaopune@gmail.com | ०१ |

- **अनुदान :-**

प्रकल्पासाठी राकृवियो मधुन अनुदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. जिल्हास्तरावर जिअकृअ यांचे कार्यालयातील बँक खात्यावर अनुदान जमा करण्यात येईल. त्यानुसार मार्गदर्शक सुचनामध्ये नमुद केल्यानुसार सर्व समुह यांना जि.अ.कृ.अ यांच्याकडून अनुदानाची अदायगी करण्यात येईल. या प्रकल्पाकरिता उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधी विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र जि.अ.कृ.अ यांच्या स्वाक्षरीने संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५. यांना वेळेत सादर करावे.

- **अनुदानाची द्विवक्ती :-**

प्रकल्पातील अनुदानाची अदायगी करताना एकाच शेतकरी समुहाला त्याच बाबीकरिता अन्य योजनांमधुन अनुदान देऊ नये. अशा प्रकारे अनुदानाची द्विवक्ती होणार नाही याची जि.अ.कृ.अ यांनी दक्षता घ्यावी.

- **आहरण व संवितरण अधिकारी :-**

या कार्यक्रमांतर्गत सन २०१५-१६ साठी आयुक्तालय स्तरावर संचालक फलोत्पादन, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-०५ व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी पुणे, नाशिक, सांगली व सोलापूर आहरण व संवितरण अधिकारी म्हणुन घोषित करणे प्रस्तावित आहे.

➢ **तपासणी :-** प्रकल्पातील शेतक-यांना देण्यात येणा-या घटकांची तपासणी गाव पातळीवरील तालुका पातळीवरील पथकामार्फत करावी. जिल्हा पातळीवरील पथकामार्फत सुध्दा प्रकल्पातुन झालेल्या काही कामाची प्रत्यक्ष तपासणी करावी.

➢ **प्रकल्प प्रगती अहवाल:-**

प्रकल्पाचे साप्ताहिक व मासिक प्रगती अहवालाचे नमुने सोबत जोडले आहेत. महिनासंयंत्रणाच पुढील महिन्याच्या १० तारखेपुर्वी भौतिक व आर्थिक लक्ष / साध्याचा प्रगती अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी कृषि आयुक्तालयास सादर करावेत. साप्ताहिक प्रगती अहवाल दर शुक्रवारी विहित नमुन्यामध्ये सादर करावेत. प्रकल्पाच्या बाबनिहाय प्रगतीचे महत्वाचे फोटो/ऑडिओ/व्हिडीओ क्लिप तयार करुन त्याची सविस्तर यशोगाथा तयार करावी. प्रकल्पातील सुरुवातीपासुन ते विक्री व्यवस्थेपर्यंतच्या सर्व बाबींचा त्यामध्ये समावेश असावा. प्रकल्पातील उद्दिष्टे व त्यानुसार प्राप्त झालेल्या निष्कर्ष याचा अहवाल देण्यात यावा.

➢ **लेखापरिक्षण :-**

या प्रकल्पाकरीता प्रामुख्याने रा.कृ.वि.योजनेतुन अनुदान उपलब्ध झालेल्या अनुदानाचे लेखापरिक्षण रा.कृ.वि.योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात यावे.

➢ **नाविन्यपुर्ण प्रकल्प :-**

शासकीय आणि खाजगी क्षेत्राच्या सहभागतून राबविण्यात येणारा हा महत्वाकांक्षी प्रकल्प असल्यामुळे प्रत्येक स्तरावर योग्य समन्वय ठेवून सदरचा प्रकल्प यशस्विरित्या राबवावयाचा आहे. याची सर्व भागीदारांनी सर्व स्तरावर काळजी घ्यावी.

**सोबत :- १.** शासन निर्णयाची प्रत
२. शेतकरी निवड नोंदणी प्रपत्र
**३.** समुहाची यादी.
**४.** मशनरीची यादी.

**मा. आयुक्त कृषि यांचे मान्यतेने.**

**स्वाक्षरीत/-**
**संचालक (फलोत्पादन)**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११००५**